# वसंतराव पवार विधी महाविद्यालयाचे कायदेविषयक जागरूकता शिबीर संपन्न




दि.२९/०७/२०१६ रोजी देऊळगाव रसाळ येथे वसंतराव पवार विधी महाविद्यालयाच्या वतीने कायदेविषयक जागरूकता शिबीर घेण्यात आले. सदरचा कार्यक्रम गावातील ग्रामदैवताच्या मंदिरात घेण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी देऊळगाव रसाळच्या सरपंच सौ.कौशल्याबाई सपकळ होत्या.या प्रसंगी आपल्या प्रास्ताविकात महाविद्यालयाचे प्राचार्य पी.अशोक कुमार यांनी या शिबिराच्या माध्यमातून गरजू लोकांनी महाविद्यालयाच्या मोफत कायदेविषयक सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. त्यानंतर महाविद्यालाच्या राजनंदिनी जगताप , पृथ्वीराज जगताप,मंगेश लोंढे,फिरोज शेख ,नामदेव सोनावले या विद्यार्थ्यांनी ग्राहक संरक्षण कायदा , कौटुंबिक हिंसाचार कायदा , महिलांचे संविधानिक अधिकार , हिंदू विवाह कायदा , वारसा कायदा, महसूल कायदा या विषयावर ग्रामस्थांना मार्गदर्शन केले. त्याचबरोबर महाविद्यालाचे प्रा. अजित मुरुमकर यांनी महिला सबलीकरण व प्रा. अतुल शहाणे यांनी दिवाणी कायदा या विषयावर मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी विद्यार्थ्यांनी गावातील लोकांकडून प्रत्यक्ष भेटीतून सर्वेक्षणाच्या माध्यमातून लोकांच्या कायदेविषयक अडचणी जाणून घेतल्या व त्यानुसार वरील वेगवेगळ्या कायद्याचे मार्गदर्शन केले. कार्यक्रमात प्रमुख पाहुण्यांचे व प्रतिष्ठितांचे स्वागत वृक्षाचे रोप देऊन करण्यात आले व कार्यक्रमानंतर प्रमुख पाहुणे व प्रतिष्ठितांच्या हातून वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी गावातील प्रतिष्ठित नागरिक , पदाधिकारी व महाविद्यालयाचे विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालायचे कर्मचारी नितीन झगडे व दीपक रसाळ यांनी विशेष परिश्रम घेतले.

कृपया हि बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकामध्ये छापावी.

कळावे

**आपला विश्वासू**

प्रा.डॉ.पी.अशोक कुमार
विद्या प्रतिष्ठानचे
वसंतराव पवार विधी महाविद्यालय
बारामती